डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच् डी.
प्र. कार्यक्रम समन्वयक


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना


गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०


**संदर्भ : रासेयो/४३१/१६** **दि. ०५/१२/२०१६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**पुणे जिल्हा**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : विशेष शिबिरामध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबाबत...**

मा. महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयांच्या मार्फत माहे डिसेंबर २०१६ / जानेवारी २०१७ मध्ये ७ दिवसीय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या शिबिरांमध्ये राबविण्यात येणाऱ्या उपक्रमा विषयी राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर नियोजन जिल्हानिहाय सभेमध्ये सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांना मार्गदर्शन तसेच सुचित करण्यात आलेले आहे.

राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे आयोजन ज्या गावामध्ये करण्यात आले आहे, त्या गावाचे सोबत जोडलेल्या फॉर्मनुसार सर्वेक्षण करुन त्याची संपूर्ण माहिती भरुन सदर फॉर्म शिबिर संपन्न झाल्यानंतर त्वरीत रासेयो कार्यालयास पत्राद्वारे जमा करावे, ही विनंती.

*सोबत : गाव सर्वेक्षण फॉर्म*

**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

# Savitribai Phule Pune University: Baseline Survey of NSS Villages

## Department of National Service Scheme & Interdisciplinary School of Health Sciences

## महाविद्यालयातील NSS उपक्रम प्रमुखांसाठी मार्गदर्शनपर सूचना

## I. गाव-पातळीवरील माहिती संकलन प्रश्नावली

1) सदर प्रश्नावली एका गावासाठी एकच भरावी.
2) साधारण गाव-पातळीवर हि प्रश्नावली भरायला १० ते १५ मिनिटे एवढा वेळ लागू शकतो हे लक्षात घेऊन गाव-पातळीवर सर्वेक्षणाचे नियोजन करावे.
3) कृपया प्रश्नावली भरण्यापूर्वी सर्व प्रश्न वाचून घेऊन मग प्रश्नावली भरावी.
4) सर्व बहुविध पर्यायी प्रश्नांमध्ये प्रत्येक पर्यायासमोर चौकट किंवा बॉक्स दिला असून, मुलाखत देणाऱ्याच्या उत्तराप्रमाणे जो पर्याय लागू होत असेल त्या पर्यायावर बरोबरची (√) खूण करावी.
5) होय किंवा नाही या पर्यायांसमोर लागू असेल त्या पर्यायावर बरोबरची (√) खूण करावी.
6) सदर प्रश्नावली सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य किंवा ग्रामसेवक किंवा गावातील माहितगार व्यक्तींकडूनच माहिती घेऊन भरावी.
7) प्रश्न क्रमांक ३ मध्ये गाव-पातळीवर कुटुंब व घर हि वेगवेगळी माहिती उपलब्ध असल्यास भरावी, कुटुंबांची माहिती उपलब्ध नसल्यास केवळ घरांची संख्या भरावी.
8) प्रश्न क्रमांक ४, ५, ६ चे उत्तर निश्चित किलोमीटरमध्ये मुलाखत देणाऱ्याला सांगता येत नसेल, तर अंदाजे अंतर किलोमीटर मध्ये विचारून लिहावे.
9) बहुपर्यायी प्रश्नांमध्ये इतर (स्पष्ट लिहा) हा पर्याय असेल तेव्हा दिलेले पर्याय सोडून इतर कोणते उत्तर आले तर ते स्पष्टपणे लिहावे.
10) प्रश्न क्रमांक १२ चे उत्तर देताना २ पेक्षा जास्त ग्राम-विकास योजनांची नावे सांगितली तर ती नावे अतिरिक्त कागद जोडून लिहावीत व नंतर तो कागद प्रश्नावलीला स्टेपल करावा.
11) प्रश्न क्रमांक १६ चे उत्तर देताना गावात सोयी-सुविधा उपलब्ध नसल्यास, त्या सुविधा किती किलोमीटर अंतरावर आहेत हे विचारले आहे, निश्चित अंतर किलोमीटरमध्ये माहित नसल्यास अंदाजे अंतर किलोमीटरमध्ये लिहावे.
12) प्रश्न क्रमांक १७ व १८ चे उत्तर देताना कृपया लक्षात घ्यावे कि पर्यायांसमोर खूण व संख्या असे दोन रकाने दिले आहेत, त्यात खूण रकान्यामध्ये बरोबरची (√) खूण करावी व संख्या रकान्यामध्ये किती संख्या आहे ते लिहावे.
13) संपूर्ण प्रश्नावली मध्ये कोठल्याही प्रश्नाचे उत्तर लिहिताना जागा कमी पडल्यास अतिरिक्त कागद जोडून तो प्रश्न पूर्ण करावा व नंतर तो कागद प्रश्नावलीला काळजीपूर्वक स्टेपल करावा.
14) दुसऱ्या पानावर शेवटच्या चौकटीमध्ये प्रश्नावली भरणाऱ्या महाविद्यालयाचे नाव, तसेच NSS उपक्रमात माहिती गोळा करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव, उपक्रम प्रमुखाचे नाव, मोबाईल क्रमांक व माहिती गोळा केल्याचा दिनांक आवर्जून लिहावा.

## II. कुटुंब-पातळीवर घ्यायच्या माहितीची प्रश्नावली: सूचना

1) सदर प्रश्नावली एका घरासाठी एकच भरावी. हि प्रश्नावली गावातील सर्व घरांमध्ये जाऊन भरून घ्यावी. एकही घर हे सर्वेक्षण करताना सुटू नये याची दक्षता घ्यावी.
2) साधारण एका घरामध्ये हि प्रश्नावली भरायला १० ते १५ मिनिटे एवढा वेळ लागू शकतो हे लक्षात घेऊन गाव-पातळीवर सर्वेक्षणाचे नियोजन करावे.
3) NSS ट्रेनिंगच्या वेळी मिळालेल्या एका हार्ड कॉपी वरून कृपया गावामधील घरे किती असतील याचा बरोबर अंदाज घेऊन घरटी एक प्रश्नावलीची कॉपी या हिशेबानी झेरोक्स कॉपी/ फोटोकॉपी काढून घ्यावी. काही कॉपी खराब होऊ शकतात याची शक्यता गृहीत धरून अतिरिक्त कॉपीदेखील काढून घ्याव्यात, म्हणजे गावात प्रत्यक्ष सर्वेक्षण करताना कॉपी कमी पडून काम अडणार नाही.
4) सदर प्रश्नावली शक्यतो कुटुंबप्रमुखाकडून माहित घेऊन भरावी, कुटुंब प्रमुख घरी नसल्यास घरातील १८ वर्षांपुढील जबाबदार व्यक्तींकडूनच माहिती घेऊन सदर प्रश्नावली भरावी.
5) कृपया प्रश्नावली भरण्यापूर्वी सर्व प्रश्न वाचून घेऊन मग प्रश्नावली भरावी.

**प्रश्नावली भरताना काहीही अडचण आल्यास, शंका असल्यास डॉक्टर अभय कुदळे, आरोग्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याशी 9881435808 या मोबाईल फोनवर संपर्क साधावा.**

6) सर्व बहुविध पर्यायी प्रश्नांमध्ये प्रत्येक पर्यायासमोर चौकट किंवा बॉक्स दिला असून, मुलाखत देणाऱ्याच्या उत्तराप्रमाणे जो पर्याय लागू होत असेल त्या पर्यायावर बरोबरची (√) खूण करावी.
7) होय किंवा नाही या पर्यायांसमोर लागू असेल त्या पर्यायावर बरोबरची (√) खूण करावी.
8) प्रश्न क्रमांक ४ मध्ये कौटुंबिक माहिती देणाऱ्या व्यक्तीचे संपूर्ण नाव लिहावे.
9) प्रश्न क्रमांक ५ विचारण्यापूर्वी बॉक्समध्ये दिलेल्या सूचना जरूर वाचाव्यात.
10) प्रश्न क्रमांक ५ कुटुंबाबद्दल माहिती भरताना खालील आणखी सूचना कृपया लक्षात घ्याव्यात.
    - **a.** प्रश्न क्रमांक ४ येथे माहिती देणाऱ्याचे संपूर्ण नाव -स्वतःचे, वडिलांचे व आडनाव आले असल्याने प्रश्न क्रमांक ५ मधील पहिल्या रकान्यात कुटुंबियांचे नाव - फक्त पहिले नाव लिहावे.
    - **b.** कुटुंबप्रमुखाशी नाते लिहिताना पहिल्या ओळीवर फक्त कुटुंबप्रमुखाचे नाव लिहावे व नंतरच्या ओळींवर इतर त्या कुटुंबातील सदस्यांची नावे लिहावीत.
    - **c.** कुटुंबातील सदस्याची लिंग लिहिताना पुढील कोडचा वापर करावा. (१) पुरुष, (२) महिला.
    - **d.** कुटुंबातील सदस्यांचे वय पूर्ण झालेल्या वर्षात आकड्यात लिहावे.
    - **e.** कुटुंबातील सदस्यांची सध्याची वैवाहिक स्थिती लिहिताना पुढील कोडचा वापर करावा. (१) विवाहित, (२) अविवाहित, (३) विधवा/विधुर, (४) घटस्फोटीत, (५) नांदत नाहीत/वेगळे राहतात.
    - **f.** कुटुंबातील सर्व विवाहित सदस्यांचे लग्नाच्या वेळी असलेले वय विचारून लिहावे.
    - **g.** कुटुंबातील सदस्यांचे शिक्षण लिहिताना पूर्ण शिक्षण झालेल्या इयत्ता लिहाव्यात. ६ वर्षांखालील बालके शाळेत जात नसल्याने तिथे मोकळी जागा सोडावी. जे प्रौढ सदस्य शाळेत गेले नसतील त्यांचे शिक्षण अशिक्षित म्हणून लिहावे, जर साक्षरता वर्गात शिक्षण घेतले असेल तर नवसाक्षर म्हणून लिहावे.
    - **h.** कुटुंबातील सदस्यांचा सदस्यांचा सध्याचा व्यवसाय लिहावा. विशेषतः महिला घराबाहेर जाऊन काम करून घरखर्चाला हातभार लावत असतील तर त्यांच्या कामाचा आवर्जून उल्लेख करावा.
11) प्रश्न क्रमांक ७ चे उत्तर देताना ४ पेक्षा जास्त ग्राम-विकास योजनांची नावे सांगितली तर ती नावे अतिरिक्त कागद जोडून लिहावीत व नंतर तो कागद प्रश्नावलीला स्टेपल करावा.
12) प्रश्न क्रमांक १० A चे उत्तर देताना १ ते १९ सर्व पर्याय विचारून मगच लागू असेल त्या पर्यायावर बरोबरची (√) खूण करावी.
13) प्रश्न क्रमांक १० C चे उत्तर लिहिताना होय किंवा नाही यापैकी कोणता पर्याय लागू होतो त्याप्रमाणे होय असल्यास प्रश्न क्रमांक C1 व नाही असल्यास प्रश्न क्रमांक C3 विचारावा.
14) प्रश्न क्रमांक १७ विचारल्यानंतर समोरच्या बॉक्समध्ये आजार असे छापलेले आहे, तिथे मुलाखत देणारा सांगेल तो आजार लिहावा व खाली दिलेले कोड लक्षात घेऊन दोन बॉक्स आहेत, एक ५ वर्षाखालील मुलांसाठी व दुसरा १८ वर्षे वयाच्या पुढच्या प्रौढांसाठी* त्यामध्ये योग्य तो कोड टाकून पर्याय लिहावेत. जर वय वर्षे ६ ते १७ यामध्ये कोणी आजारी असेल तर दोन्हीपैकी* कोड तेच वापरून लिहावे व तसा उल्लेख प्रश्नावलीमध्ये करावा.
15) संपूर्ण प्रश्नावली मध्ये कोठल्याही प्रश्नाचे उत्तर लिहिताना जागा कमी पडल्यास अतिरिक्त कागद जोडून तो प्रश्न पूर्ण करावा व नंतर तो कागद प्रश्नावलीला काळजीपूर्वक स्टेपल करावा.
16) चौथ्या पानावर शेवटच्या चौकटीमध्ये प्रश्नावली भरणाऱ्या महाविद्यालयाचे नाव, तसेच NSS उपक्रमात माहिती गोळा करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव, उपक्रम प्रमुखाचे नाव, मोबाईल क्रमांक व माहिती गोळा केल्याचा दिनांक आवर्जून लिहावा

# Savitribai Phule Pune University: Survey of NSS Villages

## गाव-पातळीवरील माहिती संकलन प्रश्नावली

| | | |
|---|---|---|
| 1. | गावाचे नाव | |
| 2. | गावातील एकूण वाड्या/ पाडे | |
| 3. | गावातील एकूण कुटुंबे व घरांची संख्या | |
| 4. | गावापासून नजीकच्या राष्ट्रीय/राज्य महामार्गाचे अंतर (कि.मी.)? | |
| 5. | गावापासून नजीकच्या रेल्वेस्टेशनचे अंतर (कि.मी.)? | |
| 6. | गावापासून नजीकच्या शहराचे अंतर (कि.मी.)? | |
| 7. | सरपंचाचे संपूर्ण नाव | |
| 8. | सरपंच महिला आहे कि पुरुष?: (एकाच पर्यायावर √ खूण करा) | 1. पुरुष [ ] 2. महिला [ ] |
| 9. | गावातील मुख्य पिके कोणती? साधारण कोणती पिके प्रामुख्याने घेतली जातात? (मुलाखतदार म्हणेल त्या सर्व पर्यायांवर √ खूण करा) | 1. तांदूळ [ ]<br>2. गहू [ ]<br>3. ऊस [ ]<br>4. भाज्या/ फळे/ फुले [ ]<br>5. इतर (स्पष्ट लिहा)____________________ [ ] |
| 10. | गावामध्ये वीज (Electricity) आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 11. | वीजपुरवठा कपात (Load shedding): गावामध्ये दिवसातून किती तास वीजपुरवठा बंद केला जातो? (एकाच पर्यायावर √ खूण करा) | 1. एक ते दोन तास [ ]<br>2. तीन ते चार तास [ ]<br>3. पाच ते सहा तास [ ]<br>4. सात व त्यापेक्षा अधिक तास [ ] |
| 12. | गावामध्ये सध्या कार्यान्वित असलेल्या ग्राम विकास योजनांची नावे सांगा. पुढील चौकटीमध्ये नावे लिहावीत ⟹ | 1.<br>2. |
| 13. | गावात कोणत्या सहकारी संस्था कार्यरत आहेत? (मुलाखतदार म्हणेल त्या सर्व पर्यायांवर √ खूण करा) | 1. दुध सहकारी संस्था/ सोसायटी [ ]<br>2. क्रेडीट को-ओप सोसायटी/ पतसंस्था [ ]<br>3. इतर (स्पष्ट लिहा)____________________ [ ] |
| 14. | गावामध्ये प्रवासासाठी उपलब्ध वाहतूक सुविधा (मुलाखतदार म्हणेल त्या सर्व पर्यायांवर √ खूण करा) | 1. उपलब्ध नाही [ ]<br>2. एसटी बस [ ]<br>3. खाजगी जीप/ रिक्षा [ ]<br>4. इतर (स्पष्ट लिहा)____________________ [ ] |
| 15. | गावाला जोडणारा रस्ता 'बारमाही रस्ता' आहे का? सर्व वर्षभर गावाचा संपर्क या रस्त्याद्वारे बाहेरील जगाशी राहतो का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |

16. **गावात उपलब्ध सार्वजनिक सोयी-सुविधा**

| **गावात सध्या उपलब्ध असलेल्या सार्वजनिक सोयी-सुविधांवर √ खूण करा** | **होय** | **नाही** | **गावात सोयी-सुविधा उपलब्ध नसल्यास गावानजीक सदर सुविधा किती अंतरावर आहेत ते लिहा (कि.मी. मध्ये)** |
|---|---|---|---|
| 1. पोस्ट ऑफिस | | | |
| 2. बँक - राष्ट्रीयकृत (Nationalized) | | | |
| 3. बँक - खाजगी (Private) | | | |
| 4. एटीएम सुविधा ATM Facility | | | |
| 5. प्राथमिक शाळा | | | |
| 6. हायस्कूल | | | |
| 7. कनिष्ठ महाविद्यालय (Junior College) | | | |
| 8. वरिष्ठ महाविद्यालय (Degree College) | | | |
| 9. अंगणवाडी | | | |
| 10. बालवाडी, प्रि-स्कूल, नर्सरी, प्ले-ग्रुप | | | |
| 11. गावात बाजार दररोज भरतो | | | |
| 12. गावात आठवडा बाजार दररोज असतो | | | |

# Savitribai Phule Pune University: Survey of NSS Villages
## गाव-पातळीवरील माहिती संकलन प्रश्नावली

| गावात सध्या उपलब्ध असलेल्या सार्वजनिक सोयी-सुविधांवर √ खूण करा | होय | नाही | गावात सोयी-सुविधा उपलब्ध नसल्यास गावानजीक सदर सुविधा किती अंतरावर आहेत ते लिहा (कि.मी. मध्ये) |
|---|---|---|---|
| 13. दूरध्वनी केंद्र (Telephone exchange) | | | |
| 14. मोबाईल फोन टावर (Mobile Phone Tower) | | | |
| 15. MSCIT- Computer centre संगणक प्रशिक्षण केंद्र | | | |
| 16. इन्टरनेट सुविधा केंद्र Internet Cafe | | | |
| 17. देशी, विदेशी दारू/ मद्य दुकान/ बार | | | |
| 18. उपहारगृहे, हॉटेल, नाश्ता सेंटर | | | |

17. गावात उपलब्ध आरोग्य सोयी-सुविधा (मुलाखतदार म्हणेल त्या सर्व पर्यायांवर √ खूण करा व संख्या लिहा.)

| आरोग्य सोयी-सुविधा | खुण | संख्या | आरोग्य सोयी-सुविधा | खुण | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1. आरोग्य उपकेंद्र | | | 4. खाजगी डॉक्टर | | |
| 2. प्राथमिक आरोग्य केंद्र | | | 5. औषधाचे दुकान | | |
| 3. फिरता दवाखाना /Mobile clinic | | | 6. इतर (स्पष्ट लिहा) __________ | | |

4. गावामध्ये आरोग्य अधिकारी अथवा कर्मचारी आहेत त्यापैकी कोण-कोण गावात मुक्कामाला थांबतात? (मुलाखतदार म्हणेल त्या सर्व पर्यायांवर √ खूण करा व संख्या लिहा.)

| आरोग्य अधिकारी अथवा कर्मचारी | खुण | संख्या |
|---|---|---|
| 1. गावात कोणीच मुक्कामाला नसते | | |
| 2. नर्सबाई, सिस्टर / ANM | | |
| 3. बहुविध कर्मचारी/ MPW | | |
| 4. सरकारी डॉक्टर / Govt. Dr | | |
| 5. खाजगी डॉक्टर/ Pvt. Dr. | | |
| 6. इतर (स्पष्ट लिहा) ____________ | | |

5. गावातील जास्त करून प्रसूती / Delivery प्रामुख्याने कुठे होतात? (एकाच पर्यायावर √ खूण करा)

| | |
|---|---|
| 1. सरकारी इस्पितळे व इतर केंद्रे | |
| 2. खाजगी इस्पितळे/ Hospitals | |
| 3. घरी | |
| 4. इतर (स्पष्ट लिहा) ____________ | |

6. शेतमाल तसेच इतर उत्पादने विकण्यासाठी गावकरी पुढीलपैकी कोणत्या बाजारामध्ये जाणे पसंत करतात?

| | |
|---|---|
| 1. स्थानिक बाजारपेठ | |
| 2. पुणे मार्केट | |
| 3. मुंबई मार्केट | |
| 4. इतर (स्पष्ट लिहा) ____________ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7. | या गावाजवळ एखादे औद्योगिक क्षेत्र, कारखाने (Industry) आहे का? | 1. होय | | 2. नाही | |
| 8. | गावाजवळ एखादे औद्योगिक गोदाम, कोठार, वखार आहे का? | 1. होय | | 2. नाही | |
| 9. | या गावातील जमिनीवर कोणताही व्यापारी तत्वावरील गृहप्रकल्प जसे की बंगला, प्लॉट, रो हाउस, बहुविध मजली इमारती, इत्यादी सुरु आहे का? | 1. होय | | 2. नाही | |
| 10. | सदर गाव पर्यटनस्थळ अथवा तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे का? | 1. होय | | 2. नाही | |
| 11. | या गावात यात्रा, जत्रा, उरूस होतो का? | 1. होय | | 2. नाही | |
| | | जर होय तर कोणत्या महिन्यात? | | | |

| | |
|---|---|
| सदर प्रश्नावली भरणाऱ्या महाविद्यालयाचे नाव | |
| महाविद्यालयातील NSS उपक्रमात सहभागी होऊन माहिती गोळा करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव | |
| महाविद्यालयातील NSS उपक्रम प्रमुख अधिकाऱ्याचे नाव व मोबाइल क्रमांक | नाव:<br>मोबाइल क्रमांक: |
| माहिती गोळा केल्याचा दिनांक | |

# Savitribai Phule Pune University: Baseline Survey of NSS Villages

**Form #**

**Department of National Service Scheme & Interdisciplinary School of Health Sciences**

**कुटुंब-पातळीवर घ्यायच्या माहितीची प्रश्नावली**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | गावाचे नाव | | 3. | घरक्रमांक (ग्रामपंचायतीने दिला असल्यास) | |
| 2. | वाडीचे / पाडयाचे/ वस्तीचे नाव | | 4. | कौटुंबिक माहिती देणाऱ्याचे संपूर्ण नाव | |

5. **कुटुंबाबद्दल माहिती: सध्या आपल्या घरात राहणाऱ्या आपल्या सर्व कुटुंबियांची माहिती आम्हाला द्या**

**कृपया पुढील सूचना वाचा:** कुटुंबप्रमुखाचे नाव आणि माहिती पहिल्या ओळीवर लिहा आणि नंतर इतरांची माहिती भरा. सध्या घरात राहणाऱ्या सर्व कुटुंबियांची माहिती घ्या. कुटुंबामध्ये खाली दिलेल्या ११ पेक्षा जास्त सदस्य असल्यास त्यांची माहिती वेगळ्या कागदावर भरून या प्रश्नावलीला स्टेपल करावी.

| क्र. | कुटुंबियांचे पहिले नाव | कुटुंबप्रमुखाशी नाते | लिंग | वय (पूर्ण वर्षात) | वैवाहिक स्थिती | लग्नाच्या वेळी वय | पूर्ण झालेले शिक्षण | सध्याचा व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | | स्वतः कुटुंबप्रमुख | | | | | | |
| 2) | | | | | | | | |
| 3) | | | | | | | | |
| 4) | | | | | | | | |
| 5) | | | | | | | | |
| 6) | | | | | | | | |
| 7) | | | | | | | | |
| 8) | | | | | | | | |
| 9) | | | | | | | | |
| 10) | | | | | | | | |
| 11) | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| 6. | मागील ५ वर्षात तुमच्या कुटुंबातील कोणाही सदस्याला कोणत्याही सरकारी ग्रामविकास योजनेचा फायदा झाला आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 7. | जर होय तर, ज्या विकास योजनेचा/ योजनांचा फायदा झाला आहे, त्या योजनेचे/ योजनांची नावे लिहा | 1. ____ <br> 2. ____ <br> 3. ____ <br> 4. ____ |
| 8. | मागील ५ वर्षात आपल्या कुटुंबातील कोणीही व्यक्ती शहरात स्थलांतरीत झाली आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 9. | *होय असल्यास, सदर व्यक्तीचा स्थलांतराचा उद्देश व लिंग लिहावे? | |

| उद्देश | पुरुष | स्त्री | उद्देश | पुरुष | स्त्री |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण | | | लग्न | | |
| रोजगार/ नोकरी | | | इतर (स्पष्ट लिहा)______________ | | |

## 10. आर्थिक स्थिती, परिस्थितीमान व राहणीमान निर्देशांक

A. आपल्या घरामध्ये खालीलपैकी कोणत्या वस्तू आहेत? (मुलाखतदार सांगेल त्या सर्व पर्यायांवर √ खूण करा)

| Item | Tick | Item | Tick | Item | Tick |
|---|---|---|---|---|---|
| 1. वीज | | 8. Sewing machine शिवणाचे मशीन | | 15. कार,जीप, इतर चारचाकी | |
| 2. गाद्या | | 9. Mobile phone/ भ्रमण ध्वनी | | 16. Water pump पाणी मोटर पंप | |
| 3. प्रेशर कुकर | | 10. Landline telephone/ टेलीफोन | | 17. Thresher थ्रेशर | |
| 4. टेबल खुर्ची | | 11. Computer/ Laptop संगणक | | 18. Tractor ट्रॅक्टर, | |
| 5. Cot/बिछाना | | 12. Motorcycle/ any two-wheeler मोटरसायकल/ दुचाकी वाहन | | 19. Flour mill/ Atta Chakki घरगुती पिठाची चक्की | |
| 6. पंखा | | 13. Cycle सायकल | | | |
| 7. टीवी | | 14. बैलगाडी, घोड़ागाड़ी | | | |

B. आपल्या घरातील सदस्यांचा पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्त्रोत (main source of drinking water) काय आहे?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. नळाचे पाणी | | 4. बंदिस्त विहीर | | 7. टँकर | |
| 2. सार्वजनिक नळ/ कोंडाळे | | 5. मोकळी विहीर | | इतर (स्पष्ट लिहा) ______________ | |
| 3. बोअरवेल | | 6. झरा, नदी, धरण, कालवा, तलाव | | | |

| | | |
|---|---|---|
| C | आपल्या घरी वैयक्तिक शौचालय आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| C1 | <u>होय असल्यास</u>, कोणत्या प्रकारचे शौचालय आहे? | 1. मैला पाणी टाकीशी जोडलेले शौचालय [ ]<br>2. मैला पाणी खड्डयाशी जोडलेले शौचालय [ ]<br>3. इतर (स्पष्ट लिहा) [ ] |
| C2 | <u>शौचालय आहे</u> तर घरातील कोण-कोण शौचालयाचा वापर करते? | 1. कोणीच वापरत नाही [ ] 2. फक्त महिला [ ]<br>3. फक्त पुरुष [ ] 4. मुले व म्हातारी माणसे [ ]<br>5. कुटुंबातील सर्वजण [ ] 6. इतर (स्पष्ट लिहा) [ ] |
| C3 | <u>शौचालय नसल्यास</u>, शौचासाठी आपण कोठे जाता? | 1. सार्वजनिक शौचालय [ ]<br>2. उघड्यावर/ हागणदारी [ ]<br>3. इतर (स्पष्ट लिहा) [ ] |

D. आपल्या घरी स्वयंपाकासाठी कोणते इंधन प्रामुख्याने वापरले जाते?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. कोळसा | | 2. लाकूड, पेंढा, पालापाचोळा, काटक्या, शेणाच्या गोवऱ्या | | 3. रॉकेल | |
| 4. बायोगॅस | | 5. एल.पी.जी. गॅस सिलेंडर | | इतर (स्पष्ट लिहा) | |

E. या घरातील जमीन मुख्यत: कशाने बनलेली आहे? जमिनीचे आच्छादन काय आहे?

| | | | |
|---|---|---|---|
| 1. नैसर्गिक आहे तशी ठेवली आहे, माती, चिखल, शेणाने सारवलेली आहे | | 2. व्हीनाईल/ अस्फाल्ट | |
| 3. सिरामिक टाईल्स | | 4. सिमेंट | |
| 5. पॉलिश फरशी, मार्बल, ग्रेनाईट | | इतर (स्पष्ट लिहा) | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| F. | या घराचे छप्पर कशाचे बनवलेले आहे? | | | | | |
| | 1. चिखल व गवत यांचे मिश्रण करून | | 2. प्लास्टिक, पॉलिथिन शीट / पत्रे | | 3. बांबू व लाकडाने | |
| | 4. ॲस्बोस्टॉस पत्रे | | 5. कौले | | 6. इतर (स्पष्ट लिहा) | |
| G. | या घराची बाहेरील भिंत कशाने बनवलेली आहे? | | | | | |
| | 1. कच्च्या स्वरूपाची भिंत -बांबू व माती | | 2. दगड-माती | | 3. कच्या विटा | |
| | 4. दगड चुना व सिमेंट | | 5. सिमेंट कॉंक्रिट | | 6. भाजलेल्या विटा | |
| | 7. सिमेंट ब्लॉक | | इतर (स्पष्ट लिहा) | | | |
| H. | या घरात खिडक्या कशा प्रकारच्या आहेत? | | | | | |
| | 1. खिडक्या नाहीत | | 2. खिडक्या लाकडी चौकटी- काचेची तावदाने | | | |
| | 3. इतर (स्पष्ट लिहा) | | | | | |
| I. | झोपण्यासाठी या घरातील किती खोल्या वापरल्या जातात? | झोपण्यासाठीच्या खोल्या= | | | | |
| J. | या घरात स्वतंत्र स्वयंपाकाची खोली आहे का? | 1. होय | | 2. नाही | | |
| K. | या घरात तुम्ही राहता हे घर तुमच्या मालकीचे आहे किंवा तुमच्या मालकीचे आणखी दुसरे घर आहे का? | 1. होय | | 2. नाही | | |
| L. | या घरातील कोणत्याही सदस्याचे बँक अथवा पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाते आहे का? | 1. होय | | 2. नाही | | |
| 11. | या बचत खात्याचा वापर नियमित होतो का? | 1. होय | | 2. नाही | | |
| 12. | तुमचा अथवा तुमच्या कुटुंबियांपैकी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा विमा उतरवला आहे का?/ विमा काढला आहे का? | 1. होय | | 2. नाही | | |
| 13. | तुमच्याकडे अथवा तुमच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याकडे आधार कार्ड आहे का? | 1. होय | | 2. नाही | | |
| 14. | तुमच्याकडे कौटुंबिक शिधापत्रिका (रेशनकार्ड) आहे का? | 1. होय | | 2. नाही | | |
| 15. | आपल्याकडे कोणत्या रंगाचे रेशन कार्ड आहे? | | | | | |
| | 1. पिवळे | | 2. केशरी | | | |
| | 3. पांढरे | | | | | |
| 16. | तुमच्याकडे अथवा कुटुंबातील कोणत्याही सदस्याकडे डेबिट/ क्रेडीट कार्ड आहे का? | 1. होय | | 2. नाही | | |
| 17. | मागील एका महिन्यात आपल्या कुटुंबातील सदस्यांपैकी कोणीही आजारी पडले होते का? (आजाराबद्दल खाली दिलेले कोड वापरून पुढील चौकटीत लिहा)<br><u>पाच वर्षाखालील मुलांचे कोड आहेत खालीलप्रमाणे,</u><br>1. जुलाब/हगवण, 2. छाती/ फुफ्फुसाचा संसर्ग, 3. ताप, खोकला व सर्दी, 4. गोवर, 5. कावीळ, 6. इतर लहानपणीचे आजार (शब्दात लिहा)<br><u>प्रौढ (१८+ वर्षे) व्यक्तींचे कोड आहेत खालीलप्रमाणे,</u><br>7. प्रौढ व्यक्तींचे ताप, खोकला व सर्दी 8. छाती/ फुफ्फुसाचा संसर्ग- प्रौढ व्यक्ती, 9. जुलाब/हगवण-प्रौढ व्यक्ती, 10. दुखणी, कळा, वेदना 11. अपघात, जखमा, 12. क्षयरोग, 13. मलेरिया/डेंगू, 14 प्रौढव्यक्तींचे इतर आजार (शब्दात लिहा) | आजार:<br>• <u>पाच वर्षाखालील मुलांचे कोड खालील बॉक्समध्ये लिहा</u><br>• प्रौढ व्यक्तींचे कोड <u>खालील बॉक्समध्ये लिहावे</u> | | | | |
| 18. | <u>आजारी असल्यास</u>, त्यांचे आजाराचे उपचार कोठे करण्यात आले ? | | | | | |
| | 1. सरकारी डॉक्टर, दवाखाना/ हॉस्पिटल | | 2. खाजगी डॉक्टर, दवाखाना/ हॉस्पिटल | | 5 इतर (स्पष्ट लिहा) | |
| | 3. परंपरागत वैदू, हकीम, भगत | | 4. स्वयंसेवी डॉक्टर, दवाखाना, हॉस्पिटल | | | |

19. आपल्याला किंवा आपल्या घरातील इतर कोणालाही सध्या पुढीलपैकी कोणतेही आजार, आरोग्य समस्या आहेत का?

| | | | |
|---|---|---|---|
| 1. मधुमेह (डायबेटीस) | | 5. दमा / अस्थमा | |
| 2. उच्च रक्तदाब (बी. पी.) | | 5. संधिवात | |
| 3. हृदय रोग/ हार्टचा प्रोब्लेम | | 6. दाताच्या समस्या/ दंतविकार | |
| 4. किडनीचा प्रोब्लेम | | इतर (स्पष्ट लिहा) | |

| | | |
|---|---|---|
| 20. | गेल्या एक वर्षामध्ये घरातील कोणत्याही सदस्याला रस्ते अपघातात इजा-जखम झाली आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 21. | सध्या घरामध्ये कोणी गर्भवती महिला आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 22. | • होय असेल तर, सदर महिलेला प्रसूतीपूर्व सेवा जसे के धनुर्वात इंजेक्शन, लोह गोळ्या दिल्या गेल्या आहेत का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 23. | मागील एका वर्षामध्ये वैद्यकीय खर्च भागवण्यासाठी तुमच्या कुटुंबाला कोणाकडून उसने पैसे घ्यावे लागले किंवा वैद्यकीय उपचार घेण्यासाठी काही मौल्यवान वस्तू वा मालमत्ता विकावी लागली का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 24. | तुमच्या घरातील कोणाला कोणत्याही प्रकारचे अपंगत्व आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 25. | जर असेल तर मानसिक का शारीरिक अपंगत्व आहे? | 1. मानसिक [ ] 2. शारीरिक [ ] |

26. जर शारीरिक अपंगत्व असेल तर कशाप्रकारचे?

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. दिसण्यात | | 2. बोलण्यात | | 3. ऐकण्यात | | 4. हालचालीत | | 5. इतर (स्पष्ट लिहा)___________ |

| | | |
|---|---|---|
| 27. | आपल्या घरातील कोणी तंबाखू खातात किंवा बिडी- सिगारेट ओढतात का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 28. | गेल्या ५ वर्षात आपल्या कुटुंबामध्ये कोणाचा जन्म झाला आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 29. | • जर होय तर किती बाळांचा जन्म झाला आहे? | |
| 30. | गेल्या ५ वर्षात आपल्या कुटुंबामध्ये कोणाचा मृत्यू झाला आहे का? | 1. होय [ ] 2. नाही [ ] |
| 31. | जर होय तर किती जणांचा मृत्यू झाला आहे? | |

32. मृत्यू झालेल्यांचे नाव, लिंग व वय लिहावे

| क्र. | मयत व्यक्तीचे नाव | लिंग (पुरुष/ स्त्री) | वय (वर्षे) |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |

| | |
|---|---|
| सदर प्रश्नावली भरणाऱ्या महाविद्यालयाचे नाव | |
| महाविद्यालयातील NSS उपक्रमात सहभागी होऊन माहिती गोळा करणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव | |
| महाविद्यालयातील NSS उपक्रम प्रमुख अधिकाऱ्याचे नाव व मोबाइल क्रमांक | नाव: मोबाइल क्रमांक: |
| माहिती गोळा केल्याचा दिनांक | |